# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

( पूर्वीचे पुणे विद्यापीठ )

## परिपत्रक

सर्व शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी/सेवकांना या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" निमित्ताने "स्वराज्य महोत्सव" आणि "हर घर तिरंगा" या उपक्रमाअंतर्गत "युवा संकल्प अभियान समारोप" हा कार्यक्रम **मा.राज्यपाल महोदयांच्या प्रमुख उपस्थितीत** विद्यापीठातील 'खाशाबा जाधव क्रीडा संकुल' येथील 'इनडोअर हॉल' येथे सोमवार, दिनांक १५ ऑगस्ट, २०२२ रोजी दुपारी ०४.०० वाजता आयोजित करण्यात आलेला असून सदर कार्यक्रमास सर्व शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी/सेवकांनी उपस्थित राहणे कर्तव्याचा भाग म्हणून अनिवार्य असल्याचे परिपत्रक क्र. जा.क्र. एएन/३४६८, दिनांक १२ ऑगस्ट, २०२२ अन्वये कळविण्यात आले आहे.

सदर कार्यक्रमानिमित्त विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभाग, सर्व प्रशाला व प्रशासकीय विभाग हे सोमवार, दिनांक १५ ऑगस्ट, २०२२ रोजी दुपारी २.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत सुरु राहतील. सर्व शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी/सेवकांनी आपले विभागातील बायोमॅट्रिक उपस्थिती प्रणालीव्दारे आपली उपस्थिती नोंदवून विभागातील हजेरीपत्रकामध्ये स्वाक्षरी करावी, तसेच उपरोक्त कार्यक्रमास उपस्थित रहावे.

**(डॉ.प्रफुल्ल पवार)**
**कुलसचिव**

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७
जा.क्र. : एएन/ 3488
दिनांक : 13 AUG 2022

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. सर्व विभागप्रमुख, शैक्षणिक विभाग
२. सर्व संचालक, प्रशाला
३. सर्व शाखाप्रमुख, प्रशासकीय विभाग

सदर परिपत्रकातील आशय आपल्या विभागातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी/सेवकांच्या निदर्शनास आणून द्यावा, ही विनंती.